# डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला
## कृषि संशोधन केंद्र, अंजनगाव रोड, अचलपुर

**दुरध्वनी**[कार्यालय]-०७२२३/२२०११
ईमेल:arsachalpur@pdkv.ac.in
arsachalpur@gmail.com


जा.क्र. कृसंके/अचल./उद्यानविद्या/६०७/२०२६
कृषि संशोधन केंद्र, अचलपूर
सहयोगी प्राध्यापक (कृषिविद्या) यांचे कार्यालय
दिनांक- १८/०३/२०२६

## कागदी लिंबू आंबिया बहार फळांचा जाहीर लिलाव २०२६

कृषि संशोधन केंद्र, अचलपूर प्रशेत्रावरील कागदी लिंबू आंबिया बहार फळांचा जाहीर लिलाव २३/०३/२०२६ रोज ~~बुधवार~~ सोमवार सकाळी ११.००वाजता कृषि संशोधन केंद्र, अचलपूर कार्यालयात करण्याचे ठरले आहे. लिलावाच्या अटी खालील प्रमाणे आहे.

**लिलावाच्या अटी**

**लिंबूच्या बागेतील ( आंबिया बहार ) फळांच्या लिलावाच्या अटी,शर्ती व नियम**

१. प्रक्षेत्रावरील ४-प्रक्षेत्रातील लिंबूच्या बागेतील फळांच्या लिलावात भाग घेणाऱ्या इसमास रु.२०००/- अनामत रक्कम म्हणून जमा करावी लागेल. ४-प्रक्षेत्रातील लिंबूच्या बागेतील फळांच्या लिलावातील एकूण रकमेपैकी १/४ रक्कम लिलाव ज्यांचे नावाने होईल त्यास त्याच वेळी ताबडतोब किंवा मा.प्रभारी अधिकारी यांच्या परवानगी ने पुढील दिवशी भरावी लागेल. तसे न केल्यास तो लिलाव रद्द समजण्यात येऊन संबंधिताने भरलेली अनामत रक्कम जप्त करण्यात येईल.

२. लिलाव पूर्ण झाल्यावर लिलावाची उर्वरित रक्कम फळे तोडणीपूर्वी या कार्यालयात भरणा करावी लागेल, त्याशिवाय लिंबू फळे तोडण्याची परवानगी दिली जाणार नाही. तसेच दिलेल्या मुदतीस पूर्ण रकमेचा भरणा न केल्यास लिलाव रद्द समजण्यात येऊन संबंधिताने भरणा केलेली १/४ रक्कम जप्त समजण्यात येईल.त्या नंतर त्या संबंधित बागेचा फेर लिलाव मा.प्रभारी अधिकारी अधिकारात करण्यात येईल.

३. लिंबू फळांची तोडणी करण्याची परवानगी दिनांक. ३१/०७/२०२६ पर्यंत राहील व त्यासबंदीचे अधिकार हे समितीच्या निर्णयासधरुन अधीन राहील .

४. लिलाव घेणाऱ्याने प्रक्षेत्रावरील मालमत्तेचे नुकसान होणार नाही, याची दखल घ्यावी. जर विद्यापीठाच्या मालमत्तेचे नुकसान झाल्यास नियमाप्रमाणे झालेल्या नुकसानाची भरपाई करून घेतल्या जाईल.

५. विकत घेतलेल्या भागातील लिंबू बागीच्यांच्या फळांच्या रक्षणाची जबाबदारी लिलाव घेणाऱ्याची राहील.

६. लिंबू फळांच्या तोडणीची परवानगी कार्यालयीन वेळेतच राहील, त्या वेळेच्या व्यतिरिक्त परवानगी राहणार नाही, याची दखल घ्यावी.

७. लिलावात अपेक्षित किमत न आल्यास लिलाव रद्द करण्याचे/लिलाव पुन्हा करण्याचे अधिकार खालील सही करणाऱ्याकडे राखून ठेवलेले आहेत.

८. ज्या कोणास (सर्वात जास्त किंमत देणारा) बगीचा बहार देण्यात येईल त्याला बगिच्यामध्ये किंवा अन्यत्र वेळी अवेळी आक्षेपार्ह वर्तवणूक /समारंभ भोजनावळी इत्यादी कार्यक्रम करता येणार नाहीत किंवा विनाकारण मंडळी जमवता येणार नाही.

९. खते, कीटकनाशके व बुरशीनाशके कार्यालयामार्फत पुरविण्यात येतील मात्र फवारणी व पाणी देणे तसेच निंदन करणे हि कामे कार्यालय करून देईल.

१० कमीत कमी तीन किंवा त्यापेक्षा जास्त बोली बोलणारे असतील तेव्हाच लिलाव पुकारण्यात येईल.

११ **सदर लिलावा मध्ये बोली ही ४- प्रक्षेत्रातील लिंबूच्या बागेची बोलावी लागेल.** लिलाव घेतला असेल त्याचेसह प्रथम तीन उच्चतम बोली धारक सोडून इतर सर्वाची रक्कम लिलाव संपताच परत करण्यात येईल. लिलाव

घेणाऱ्या व्यतिरिक्त इतर दोन बोली धारकांची रक्कम, लिलाव घेणाऱ्याने पैसे भरताच परत करण्यात येईल.उच्चतम बोली बोलून लिलाव घेण्या—याने बोलीची रक्कम न भरल्यास दुस—या क्रमांकाच्या बोली धारकास लिलाव देण्यात येईल व दुस—या क्रमांकांच्या बोली धारकाने बोलीची रक्कम न भरल्यास तिस—या क्रमांकांच्या बोली धारकास लिलाव देण्यात येईल.

१२ लिलावाची अपेक्षित किंमत न आल्यास लिलाव कमेटी लिलाव रद्द करेल.

१३ फळे तोडतांना कुठलेही नुकसान होणार नाही याची काळजी घ्यावी लागेल. नुकसान झाल्यास त्याची भरपाई खरेदीदाराकडून करण्यात येईल.

१४ लिलावाची अंतिम बोली ग्राहय झाल्यावर संबधीत खरेदीदारास रू १००/—चे जनरल स्टॅम्प पेपरवर करारनामा करून द्यावा लागेल.

१५ लिलाव मंजूर झाल्यावर फळबाग राखणीची जबाबदारी, फळांची तोडणी तसेच राखणदाराची राहण्याची व्यवस्था करणे खरेदीदाराकडेच राहील.

१६ खते, ओलीत किंवा अन्य कोणतीही मशागत विद्यापीठाचे वेळापत्रका नुसारच केल्या जाईल.

१७ नैसर्गिक आपत्तीमुळे काही नुकसान झाल्यास त्या करिता हे कार्यालय जबाबदार राहणार नाही.

१८ कोणत्याही कारणावरून खरेदीदार व केन्द्राचे अधिकारी यांच्यामध्ये वाद निर्माण झाल्यास अंतिम निर्णय हा मा. संशोधन संचालक, डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला यांचा दोघांनाही बंधनकारक राहील.

१९ काही कारणा वरून बोली बोलणाऱ्यास अपात्र ठरविण्याचा अधिकार लिलाव कमेटीस राहील.

२० संपूर्ण फळे तोडणी झाल्यानंतर लिलाव घेणाऱ्यास सुरक्षा ठेव (Security Deposit)परत मिळण्याकरिता प्रभारी अधिकारी, कृषि संशोधन केंद्र, अचलपुर या नावाने अर्ज करावा लागेल व त्यानंतर सुरक्षा ठेव परत करण्यात येईल.

२१ सुरक्षा ठेव रक्कमेवर कोणत्याही प्रकारचे व्याज मिळणार नाही.

प्रभारी अधिकारी
कृषि संशोधन उपकेंद्र
अचलपूर, जि.अमरावती